शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ३४५/१८/०६/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# शहर स्वच्छता मोहिमेत सर्वांनी सहभागी होऊन अभियान यशस्वी करा : खासदार चंद्रकांत खैरे यांचे आवाहन

## स्वच्छ भारत मोहिमेच्या धर्तीवर तीन दिवस सर्व क्षेत्रातील अधिकारी व पदाधिकारी मनपा आदिचा शहर स्वच्छतेसाठी पुढाकार

**संभाजीनगर ( ता.२२ ) :** शिवसेना सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असते क्षेत्र कुठलेही असो सर्व सामान्य नागरिकांपर्यत सेवा पुरविणे हा ध्यास कायम आहे. यांचा प्रत्यय पालकमंत्री रामदास कदम यांच्या संकल्पेनेतुन २६-२७ व २८ ऑगस्ट २०१५ दरम्यान संभाजीनगर शिवसेना व मनपा यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य शहर स्वछता मोहित राबविण्यात येणार आहे. या अभियानात शिवसेना संभाजीनगरचे सर्व पदाधिकारी, नगरसेवक, शिवसैनिक, सर्वपक्षीय कार्यकर्ते, सामाजिक संस्था, शाळा, महाविद्यालय यांनी संख्येने हिरहिरीने पुढाकार घेऊन यशस्वी करण्याचे आवाहन शिसवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केले. शिवसेना भवन, औरंगपुरा येथे आयोजित पूर्व तयारी बैठकीस त्यांनी प्रमुख मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांनी महापौर त्र्यंबक तुपे यांनी महानगरपालिका या मोहिमेत सहभागी होऊन शहरवासीयांना दैनदिन स्वच्छतेबरोबर अधिक सेवा देण्याचे कार्य करु सर्व प्रभागातील वॉर्ड अधिकारी अभियंता, स्वच्छता कर्मचारी यांच्यासह अधिक ५०० ते ६०० कर्मचारी कामाला लावून शहर स्वच्छ करण्याची मोहिम यशस्वी करु. यामध्ये सर्वांनी सहभागी व्हावे व आरोग्य सुधारणा व्हावी करिता स्वच्छ शहर सुंदर शहर बनवण्याचे आवाहन त्यांनी केले. महानगरप्रमुख प्रदिप जैस्वाल यांनी आपल्या मनोगतात शहर स्वच्छता मोहीमेचे स्वागत करुन सर्वांनी सहभागी होऊन संकल्पना यशस्वी करण्याचे आवाहन केले.

यावेळी व्यासपीठावर जिल्हाप्रमुख अंबादास दानवे, उपजिल्हाप्रमुख नंदकुमार घोडेले, बंडू ओक, माजी महापौर कला ओझा, सभागृह नेता राजेंद्र जंजाळ, गटनेते राजु वैद्य, शहरप्रमुख बाळासाहेब थोरात, संतोष जेजुरकर, युवाजिल्हाधिकारी नगरसेवक ऋषिकेश खैरे, जिल्हासंघटक सुनिता आऊलवार, रंजना कुलकर्णी, सुनिता देव, माधुरी जोशी, अनिता मंत्री, प्रतिभा जगताप, विकास जैन आदिंची उपस्थिती होती.

गुरुवार दि. २६ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता पालकमंत्री तथा पर्यावरण मंत्री रामदास कदम यांच्याहस्ते मोहिमेचा शुभारंभ होणार असुन संपूर्ण तीन दिवस शहरासह ग्रामीण भागात दुष्काळाची व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या घरी भेटी देणार आहे. शहरातील सर्व सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्त्यांनी आपआपल्या भागात आवश्यक ठिकाणी आयोजन करावे. असेही आवाहन करण्यात आले आहे. यावेळी सर्व साधनसाम्रुगी शिवसेनेच्यावतीने पुरविण्यात येणार असुन सर्वांना सर्व नागरिकांच्या आरोग्यासाठी व शहर स्वच्छतेसाठी सामाजिक कार्यात सहभागी होण्याचे आवाहन शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केले आहे. यावेळी उपशहरप्रमुख हिरा सलामपुरे, बाळासाहेब सानप, राजु राजपुत, विश्वनाथ स्वामी, नानासाहेब डांगे, राजु खरे, आशुतोष डंख, विनोद बोरखडे, सचिन जोशी, राजु इंगळे, किशोर नागरे, विजय सुर्यवंशी, कृष्णा ठोंबरे, विरभद्र गादगे, संतोष खेंडके, जयसिंग होलिये, नगरसेविका शिल्पाराणी वाडकर, मनिषा लोखंडे, मनोज गांगवे, शितल गादगे, सीमा खरात, मीना गायके, राहुल सोनवणे, गणपत खरात, नरेश भालेराव, संदेश कवडे, मारोती फुलारे, राजु अहिरे, सुंगधकुमार गडवे, आत्माराव पवार, जयेश अभंग, मनोज बल्लाळ, विभीषण काळे, वसंतभाई शर्मा, विशाल नांदरकर, विशाल गायके, प्रमोद ठेंगडे, बन्सीमामा जाधव, सीताराम सुरे, वामनराव शिंदे, रमेश नारापुरे, संजय हरणे, सुभाष शेजवळ, सुमित्रा हाळनोर, चंद्रकांत गवई, नितीन साळवी, कमलाकर जगताप, रामदास गायके, पंकज भावे, अविनाश कुलकर्णी, ज्ञानेश्वर जाधव, विनोद लोखंडे, गणेश मुळे, सुरेश पवार, विनोद लोखंडे, गणेश मुळे, सुरेश पवार, विनोद जाधव महिला आघाडीच्या उपशहर संघटक दुर्गा भाटी, राजश्री पोफळे, नलिनी बाहेती, सुनंदा खरात, प्रेमलता चंदन, मंजुषा नागरे, रश्मी ढापरे, मीना बेलसरे, नगरसेविका स्वाती नागरे, सिमा चक्रनारायण, आशा भालेराव, ज्योती पिंजरकर आदिंसह शिवसेना-युवासेना-महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

**प्रसिध्दी प्रमुख**

**गणेश वाघ / मनोज वडगावकर**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400